अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
आयोजित,
शतकमहोत्सवी नाट्यसंमेलनानिमित्त, नाट्य जागर २०२४
राज्यस्तरीय खुली नाट्य अभिवाचन स्पर्धा
नियमावली

१. सदर स्पर्धा फक्त मराठी भाषेतच होईल. ही स्पर्धा प्राथमिक फेरी, उपांत्य फेरी व अंतिम फेरी ह्या स्वरूपात संपन्न होईल. नाट्यवाचन स्पर्धा ही संस्था, महाविद्यालयं इ. सर्वांसाठी खुली असेल. एका नाट्यवाचनामध्ये कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त पाच स्पर्धक एका संघात असणे आवश्यक आहे.

२. सदर स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रातील खालील केंद्रांवर खालील कालावधीत घेतली जाणार आहे. त्या संबंधित केंद्रांची माहिती खालीलप्रमाणे :

प्राथमिक फेरी – दिनांक २५ जानेवारी २०२४ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

**ग्रुप १-**

१) रत्नागिरी (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग करिता) २) कोल्हापूर / बेळगाव ३) सांगली ४) सातारा ५) सोलापूर ६) पुणे ७) नाशिक

**ग्रुप २ -**

१) जळगाव २) धुळे / नंदूरबार ३) अहमदनगर ४) बीड ५) नांदेड / परभणी / हिंगोली ६) लातूर / धाराशीव ७) छत्रपती संभाजीनगर / जालना

**ग्रुप ३ -**

१) अकोला २) अमरावती ३) नागपूर ४) चंद्रपूर / गडचिरोली / भंडारा/ वर्धा ५) वाशीम / बुलढाणा / यवतमाळ ६) ठाणे ७) नवी मुंबई ८) मुंबई

**उपांत्य फेरी-**

नाशिक आणि सांगली येथे दिनांक ११ मार्च २०२४ ते २१ मार्च २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

**अंतिम फेरी –**

मुंबई येथे दिनांक १३ आणि १४ एप्रिल २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

३. प्राथमिक फेरी वरील केंद्रांवर घेण्याचा मानस आहे, परंतु प्रवेश अर्ज किती येतील त्या संख्येवर वरील केंद्र कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार नाट्य परिषदेचा असेल. एखाद्या केंद्रावर नऊ पेक्षा कमी स्पर्धक संघ आल्यास नाट्य परिषद ठरवेल त्या केंद्रावर स्पर्धकांना नाट्यवाचन सादर करावे लागेल ह्याची नोंद घ्यावी.

४. प्रवेश अर्ज गुगलफॉर्म द्वारेच ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जातील. पोस्ट, मेल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पाठविलेल्या प्रवेश अर्जांचा विचार केला जाणार नाही. स्पर्धेची संपूर्ण माहिती www.natyaparishad.org ह्या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहे.

५. लेखकाची परवानगी घेण्याची जबाबदारी त्या त्या संघांची असेल. सदर अनुमतीपत्र स्पर्धेपूर्वी स्पर्धेच्या ठिकाणी सादर करणे आवश्यक आहे.

६. ऑनलाइन अर्जासोबतच रू. १००/- प्रवेश फी भरावी लागेल. सदर प्रवेश शुल्क भरलेले आहे त्याचे विवरण अर्जावर दिलेल्या ठिकाणी भरून पाठवणे आवश्यक आहे.
ज्या संस्था नाट्यवाचन सादर करणार नाहीत. त्यांची प्रवेश फी रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही. तसेच प्रवेश अर्जावर प्रवेश शुल्क भरल्याची माहिती नसेल तर असे अर्ज स्पर्धेतून बाद केले जातील ह्याची नोंद घ्यावी.

७. स्पर्धेची प्राथमिक फेरी महाराष्ट्रातील आपल्या जवळच्या परिषदेने ठरवून दिलेल्या केंद्रावरच संपन्न होईल. एका स्पर्धकास कोणत्याही एकाच नाट्यवाचनामध्ये आणि एकाच केंद्रावर सहभाग घेता येईल. एक केंद्र सोडून दुसऱ्या केंद्रात सहभाग आढळून आल्यास संबंधित संघ स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

८. नाट्यवाचन कालावधी कमीत कमी १५ मिनिटे व जास्तीत जास्त २० मिनिटे असेल. वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळणे हे प्रत्येक संघाचे कर्तव्य असणार आहे.
कुठल्याही प्रकाशित/अप्रकाशित नाटकातील, एकांकिकेतील प्रवेश सादर करू शकतील. शक्यतो **सुरुवात, मध्य आणि शेवट एकसंध राहण्याच्या दृष्टीने संकलित केलेला प्रवेश सादर करणे आवश्यक आहे जेणेकरून संहितेची संपूर्ण अनुभूती घेता येईल.**

९. नाट्यवाचन सादर करण्यासाठी जी वेळ दिली असेल त्याच वेळी नाट्यवाचन सादर केली पाहिजे. त्यात बदल केला जाणार नाही.

१०. **पात्रता निकष -**
प्राथमिक फेरीतून प्रत्येक केंद्रातून साधारण नऊ नाट्यवाचनामधून एक ह्या प्रमाणात उपांत्य फेरीसाठी नाट्यवाचन निवडण्यात येतील. ह्याबाबत परीक्षक आणि नाट्य परिषद जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम असेल.
उपांत्य फेरीसाठी निवड झालेली नाट्यवाचने दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी संकेतस्थळावर जाहीर केली जातील. तसेच निवड झालेल्या स्पर्धक संघांना भ्रमणध्वनीद्वारे कल्पना दिली जाईल.

११. प्राथमिक फेरी पूर्णपणे तालीम स्वरूपातच करावयाची असल्यामुळे नेपथ्य/संगीत/प्रकाशयोजना/रंगभूषा/वेशभूषा यांचा वापर करता येणार नाही ह्याची विशेष नोंद घ्यावी. उपांत्य आणि अंतिम फेरीसाठी फक्त पार्श्वसंगीताचा वापर करता येईल. परंतु त्यासाठी वेगळे गुण असणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

१२. उपांत्य फेरीसाठी निवड झालेल्या संघांना उपांत्य फेरी केंद्र व तारीख नंतर कळविले जाईल.

१३. फक्त उपांत्य आणि अंतिम फेरीत पात्र ठरलेल्या संघांना येण्या-जाण्याचा प्रवास खर्च म्हणून सांघिक रुपये १५/- प्रति किलोमीटर आणि प्रत्येकी रुपये १५०/- (जास्तीत जास्त पाच व्यक्तींना) ह्या प्रमाणे भोजन/अल्पोपहार भत्ता रक्कम देण्यात येईल. प्रवासाचे अंतर पडताळणी करून ठरविण्यात येईल. नाट्य परिषदेने ह्याबाबतीत घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. प्राथमिक फेरीसाठी कुठल्याही प्रकारचा भत्ता वा प्रवास खर्च मिळणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

१४. उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी तीस संघाची निवड करण्यात येईल. अंतिम फेरी दिनांक १३ आणि १४ एप्रिल २०२४ रोजी यशवंत नाट्य मंदिर माटुंगा, मुंबई ४०००१६. येथे संपन्न होईल.

१५. नियम व अटी तसेच स्पर्धेच्या तारखांमध्ये फेरबदल करावयाचे अधिकार अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद राखून ठेवत आहे.

१६. नियम व अटींचे पालन सहभागी संस्था, कलावंत व तंत्रज्ञांना करावेच लागेल.

१७. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल आणि तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक असेल.

१८. ह्या स्पर्धेत सादर होणाऱ्या नाट्यवाचनाचे संपूर्ण अथवा अंशतः चित्रीकरण करण्याचा आणि ते प्रसारित करण्याचा अधिकार नाट्य परिषदेने राखून ठेवलेला आहे.

१९. प्रवेश अर्ज प्रवेश मूल्यासह भरून पाठविण्याची अंतिम तारीख १० जानेवारी २०२४ सायं ६.०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.
स्पर्धेचे प्रवेश मूल्य खाली दिलेल्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. (रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही ह्याची नोंद घ्यावी)

| | |
|---|---|
| **नाव** | **:- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद** |
| **बँक खाते क्रमांक** | **: 015310110003693** |
| **बँकेचे नाव** | **: बँक ऑफ इंडिया** |
| **शाखा** | **: शिवाजी पार्क** |
| **आयएफएससी कोड** | **: BKID0000153** |

**प्रवेश मूल्य रुपये 100/-**

२०. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रत्नागिरी येथे संपन्न होणाऱ्या समारोप सोहळ्यात होईल.

**स्पर्धेची पारितोषिके :**

रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पारितोषिकांचे स्वरूप असेल.

**प्राथमिक फेरी – पारितोषिक**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट पारितोषिक | :- रू. ३,०००/- |
| उत्कृष्ट पारितोषिक | :- रू. २,०००/- |
| उत्तम  पारितोषिक | :- रू. १,०००/- |
| उत्तेजनार्थ परितोषिक | :- रू. ५००/- |

**अंतिम फेरी – पारितोषिक**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट पारितोषिक | :- रू. २५,०००/- |
| उत्कृष्ट पारितोषिक | :- रू. १५,०००/- |
| उत्तम  पारितोषिक | :- रू. १०,०००/- |
| दोन उत्तेजनार्थ परितोषिक | :- रू. ५,०००/- |

**सर्वोत्कृष्ट अभिवाचक :-**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट पारितोषिक | :- रू. ३,०००/- |
| उत्कृष्ट पारितोषिक | :- रू. २,०००/- |
| उत्तम पारितोषिक | :- रू. १,०००/- |

**स्पर्धेची वैशिष्ट्य  :-**

- मराठी रंगभूमीच्या शिखर संघटनेने प्रथमच आयोजित केलेली भव्य स्पर्धा.
- स्पर्धेची प्राथमिक फेरी महाराष्ट्रातील २२ केंद्रांवर संपन्न होणार आहे.
- सर्व कलावंतांना सहभाग प्रमाणपत्र.
- प्रथम विजेत्या नाट्यवाचनाचे शतकमहोत्सवी नाट्य संमेलनात सादरीकरण.
- स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी मराठी रंगभूमीवरील कलावंत, दिग्दर्शक, निर्माते उपस्थित राहणार.
- नाट्य परिषदेच्या शाखांमध्ये सादरीकरणाची संधी.